भाग–२

# शेती इस्त्राईलची

डॉ. सुधीर भोंगळे



# शेती इस्राईलची
भाग-२

© डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

■

**प्रकाशिका**
**डॉ. अशोका भोंगळे**
**सुज्ञान प्रकाशन**
१०, योजनगंधा सोसायटी,
श्रीपती सुतार पथ, शिवतीर्थ नगर,
पौड रोड, कोथरूड,
पुणे - ४११०३८
९८२३०५७४८५

■

**प्रथमावृत्ती :**
१६ नोव्हेंबर २०२०

**सुज्ञान प्रकाशन, पुणे**

**मुखपृष्ठ/मांडणी**
धनंजय सस्तकर
९८२२२५५७५०

■

**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
९८८१०७५२३९

■


**अक्षरजुळणी :**
**माधुरी रोडे**
१४१/१, प्रचित रेसिडेन्सी,
सोमवार पेठ, पुणे - ११
७९७२१४७७२८

■

**मुद्रक :**
शिवानी प्रिंटर्स, कसबा पेठ, पुणे

■

**किंमत : ६५० रुपये**



इस्त्रायलसारखी आधुनिक तंत्रज्ञानाने भारलेली
व शेतकऱ्यांसाठी मूल्यदायी ठरणारी शेती
भारतात फुलावी याचा आयुष्यभर ध्यास घेऊन
शेती व शेतकऱ्यांची अविरत सेवा करणाऱ्या
कै. भवरलाल हिरालाल जैन,
श्री. अजित भवरलाल जैन व श्री. अथांग अनिल जैन
यांना स्नेहपूर्वक अर्पण...

## तारून धरा आणि धरून तारा!

‘शेती इस्रायलची : भाग दुसरा’ हे पुस्तक आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद व समाधान आहे. १९९३ मध्ये मी पहिल्यांदा सहा दिवसांकरिता इस्रायलला गेलो. निमित्त होते ‘ॲग्रीटेक’ या कृषि प्रदर्शनाचे. हे प्रदर्शन व तिथली शेती पाहून आल्यानंतर प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती असतानाही वाळवंटात त्यांनी जे नंदनवन उभे केले आहे ते पाहून मी भारावून गेलो. तिथून आणलेले साहित्य आणि इस्रायलमधल्या शेतकऱ्यांशी केलेला संवाद व निरीक्षणे यांच्या आधाराने १९९४ मध्ये ‘शेती इस्रायलची’ हे पुस्तक लिहिले. ‘राजहंस प्रकाशना’ने प्रसिद्ध केले. हे माझे पहिलेच पुस्तक होते. वाचकांनी त्याला प्रचंड प्रतिसाद दिला. हजारोंनी प्रती खपल्या. पण प्रती खपणे यापेक्षा माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे महाराष्ट्राच्या शेतीला नवी आधुनिक दिशा देण्याचे काम या पुस्तकामुळे अंशतः का होईना घडले. त्याकाळी आणि अजूनही अनेक तरूण मुलांचे फोन हे पुस्तक वाचल्यावर येतात. ते म्हणतात, ‘‘तुमचे शेती इस्रायलची हे पुस्तक वाचून पेटून उठलो, नोकरी सोडली आहे. नवीन पद्धतीने शेती सुरु केली आहे. सुरुवातीला पुस्तक घेताना १७५ रु. किंमत फार वाटली पण संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर असे वाटले की हजार रूपये किंमत ठेवली असती तरी चालले असते इतका नवीन माहितीचा खजिना त्यात भरलेला आहे.’’ हे पुस्तक एका वर्षात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेले आणि पहिल्याच पुस्तकात लेखक म्हणून माझे नाव सर्वदूर पोहोचले. या पुस्तकाला अनेक पुरस्कारही मिळाले. आजही नम्रपणाने मी कबूल करतो की इतरांसारखा मी काही मोठा लेखक किंवा साहित्यिक नाही. शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेलो असल्याने आणि सासवडला (ता. पुरंदर) दहा वर्षे स्वतः शेती केलेली असल्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांसंबंधी माझ्या मनात प्रेमाची भावना आहे. त्यांची उन्नती व्हावी अशी आस आहे. इच्छेतून जी जाणिवेची खोली निर्माण होते तिला आस म्हणतात. आस ही अखंड चालणारी आंतरप्रक्रिया आहे. या प्रक्रियेनेच मला आत्तापर्यंत चार वेळा इस्रायलची शेती पाहून तिचा अभ्यास करण्यासाठी खेचून नेले.

या सर्व प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली ती जळगावच्या जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक श्री. भवरलाल हिरालाल जैन आणि त्यांचे तिसऱ्या क्रमांकाचे चिरंजीव श्री. अजित भवरलाल जैन यांनी. त्यांनी तीन वेळा मला त्यांच्या खर्चाने इस्रायलला पाठविले. ‘‘सुधीर तिथे जाऊन जे पाहतो, अभ्यास करतो, माहिती घेऊन येतो ती लेखनातून लोकांपर्यंत पोहोचवितो. त्यामुळे त्याच्यावर केलेला खर्च हा वाया न जाता समाजाच्या उपयोगी पडतो’’, अशीच भवरलालजींची म्हणजे मोठ्या भाऊंची भावना होती. हीच भावना आज कंपनीचे सह-व्यवस्थापकीय संचालक असलेल्या आणि शेती व शेतकऱ्यांच्या उन्नतीसंबंधी प्रचंड ओढ व विजीगिषा असलेल्या श्री. अजित जैन यांनी अंतःकरणात जपून ठेवून ती वाढवित नेली. २०१८ मध्ये

# म ✪ नो ✪ ग ✪ त

चौथ्यांदा जेव्हा मी इस्रायलला जाण्याची तयारी केली तेव्हा अजितभाऊ म्हणाले, ''प्रदर्शन बघायला तुम्ही जाताय पण लगेच परतण्याची घाई करू नका. १५-२० दिवस जास्तीची राहण्याची तयारी ठेवा. देशभर हिंडून सर्व शेती बघा. प्रशिक्षण घ्या. ज्यू लोक व्यापारी वृत्तीचे आहेत. ते तुम्हांला फुकट काही सांगणार नाहीत. तुम्हांला शिकवण्यासाठी फी आकारतील. त्याची व्यवस्था मी करतो. तुम्ही व्यवस्थित शिकून या. आल्यावर नवीन पुस्तक लिहा. तुम्ही पहिले पुस्तक लिहून आता २६ वर्षे झाली आहेत. शेतीचे प्रश्न आणि इस्रायलचे तंत्रज्ञान पूर्णपणे बदललेले आहे. तेव्हा हे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. हे काम तुम्ही उत्तमरित्या करू शकता.'' बोलल्याप्रमाणे त्यांनी सर्व व्यवस्था केली.

अजितभाऊंनी माझ्यात जागृत केलला विश्वास व दिलेले बळ याची फलश्रृती म्हणजे **'शेती इस्रायलची – भाग दुसरा'** हे पुस्तक होय. १९८७ मध्ये माझा प्रथम श्री. भवरलाल जैन यांच्याशी संबंध आला. मागील ३३ वर्षात तो इतका वृद्धींगत झाला की मी केव्हा त्या कुटुंबाचा भाग होऊन गेलो ते कळलेच नाही. भवरलालजींच्या कुटुंबाने मला जे प्रेम दिले, विश्वास ठेवून आपुलकी दाखविली व जन्मोजन्मीचे ऋण माझ्यावर करुन ठेवले त्या ऋणातला एक अल्पसा धागा ज्यामुळे नातेसंबंधाचा गोफ आणखीन सुंदर विणला जाणार आहे या श्रद्धेने व भावनेने हे पुस्तक आदरणीय पद्मश्री डॉ. भवरलाल जैन आणि त्यांच्याच विचारांची कास धरून ती सत्यात उतरविण्यासाठी अहोरात्र धडपडणारे श्री. अजित जैन व श्री. अथांग अनिल जैन यांना अर्पण केले आहे. या जैन कुटुंबाने आयुष्यभर शेती व शेतकऱ्यांच्या कल्याणाचे, प्रगतीचे स्वप्न पाहिले. त्यासाठी दिवसरात्र मेहनत घेऊन देह चंदनासारखा झिजविला. १९६३ मध्ये मोठ्या भाऊंनी पेटविलेला हा अग्नीकुंड सतत जळतोच आहे. तो अखंडपणे पुढेही जळत राहावा आणि त्याच्या किर्तीचा सुगंध जगभर आज पोहोचलेलाच आहे तो आणखीन विकसीत व वृद्धींगत व्हावा या शुद्ध भावनेने पुस्तक रूपाने समिधा या कुंडात सोडत आहे. संत तुकारामांची इंद्रायणीच्या डोहात बुडालेली गाथा तरून वर आली. तेवढे कर्तृत्व व पुण्याई माझी नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणून आपल्यासारख्या सूज्ञ वाचकांच्या चरणी विनंती करतो की हे पुस्तक आपण तारून धरा आणि धरून तारा!

जैन इरिगेशनची इस्रायलमध्ये 'नानदान जैन' नावाची कंपनी आहे. या कंपनीचे एक संचालक श्री. ऑफन ऑमनॉन यांनी इस्रायलमधील शेती-पाणी या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मेकोरॉट, व्होल्कॅनो ॲग्रिक्लचर रिसर्च सेंटर, बेन गुरियन युनिव्हर्सिटी इन बेरशेवा, सेंटर ऑफ द नॉर्थ गॅलिली, सेंटर ऑफ जॉर्डन व्हॅली, सेंटर ऑफ आराबा व अन्य संस्थांमध्ये नेऊन तेथील शास्त्रज्ञ, संशोधक आणि अधिकाऱ्यांशी मुलाखतीसाठी भेटी करून दिल्या. याशिवाय ओमर झेदान यांनी ग्रीनहाऊसमध्ये भाजीपाल्याचे उत्पादन घेण्याचे तंत्र आणि फलोद्यान तज्ज्ञ डोव्ह रेबर उर्फ डुबी यांनी फळबागा लागवडीचे नवीन तंत्र हे विषय मला शिकविले. प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर नेऊन त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. मेकोरॉट कंपनीचे प्रमुख डॉ. दियागो बर्गर यांनी नॅशनल कॅरिअर व इस्त्राईलमधील पाणी व्यवस्थापनाचे संपूर्ण तंत्र व शास्त्र मला शिकविले.

# म नो ग त

Seeing is believing असे म्हणतात. या न्यायाने अनेक नवनवीन तंत्रे पाहिल्यावर आपणही ती स्वीकारायलाच हवीत असे मनापासून वाटले. तीन आठवड्यांच्या काळात जे सगळे नवीन ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान गोळा केले ते आपल्या शेतकऱ्यांना समजेल अशा साध्या, सोप्या व सरळ भाषेतून येथे मांडले आहे. इस्रायली लोक मुख्यत्वे व्यापारी वृत्तीचे असल्यामुळे त्यांना माहिती व तंत्रज्ञान इतरांना सहजपणे देण्यापेक्षा माल विकण्यात अधिक रस असतो. त्यामुळे ते सहजासहजी इतरांना तंत्रज्ञान खुले करुन सांगायला तयार होत नाहीत याचा अनुभव हजारो भारतीयांनी घेतलेला आहे. इस्रायलमध्ये नव्याने विकसीत झालेल्या तंत्रज्ञानाबरोबरच नेदरलँन्ड, ऑस्ट्रेलिया, जपान, मेक्सिको, इक्वेडोर, स्पेन, कोस्टारिका व अन्य देशांमध्ये जे संशोधन व विविध पिकांमध्ये जे वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण काम व संशोधन झालेले आहे त्याची माहितीही या पुस्तकातून शेतकऱ्यांसमोर ठेवलेली आहे. जरी पुस्तकाचे नाव **'शेती इस्रायलची – भाग दुसरा'** असे असले तरीही एका अर्थाने जगातल्या शेती विकासाच्या नव्या प्रगतीच्या पाऊलखुणांचा धांडोळा अभ्यासकाच्या भूमिकेतून घेण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. ही सर्व माहिती व तंत्रज्ञान आपल्या शेतकऱ्यांना अत्यंत उपयोगी पडणारे आहे. ते त्यांनी व्यवस्थितपणे वाचून अभ्यासपूर्वक स्वीकारायला हवे.

या पुस्तक लेखनाच्या कामात डॉ. रामचंद्र गुंजाटे, डॉ. केशव पुजारी, डॉ. डी. एन. कुलकर्णी, डॉ. बी. पी. पाटील, डॉ. बाळकृष्ण जमदग्नी, डॉ. दत्तप्रसाद, वासकर, श्री. विलास शिंदे, श्री. के. बी. पाटील, डॉ. अनिल पाटील, श्री. अभिजीत जोशी, डॉ. बी. के. यादव, डॉ. दि. मा. मोरे, श्री. व्यंकटराव गायकवाड, श्री. रमेश पाटील, श्री. विलास गोविलकर, श्री. राजगोंडा पाटील, श्री. रमेश दूधनी, श्री दिलीप झेंडे, प्रा. केशवराव ठाकरे, श्री. संग्राम रामराव जगताप, श्री. व्ही. डी. पाटील, श्री. जयवंत महल्ले, डॉ. नंदकिशोर चिखले, श्री. सचिन पाटील, श्री. राहूल भारंबे व श्री. चेतन गुळवे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे.

मी लिहून काढलेल्या माहितीला पुस्तक रूपात आणण्याचे काम 'सुज्ञान प्रकाशना'च्या डॉ. अशोका भोंगळे यांनी केले. पुस्तकांची मांडणी व देखणे मुखपृष्ठ ज्यांनी तयार केले ते ज्येष्ठ चित्रकार धनंजय सस्तकर आणि ज्यांच्या अफाट मेहनतीमुळे या पुस्तकाची निर्मिती झाली ते दिलीप रोडे आणि सौ. माधुरी रोडे यांचे मानावे तेवढे आभार थोडे आहेत. या सर्वांना मनापासून नमस्कार! अधिक उणे आपण पदरात घ्यालच. ही तुमची मायेची पाखर आहे असे मानतो आणि शेवटी संत तुकारामांच्या शब्दात विनवितो…

**करविली तैसी केली कटकट । वाकुडे की नीट तुम्ही जाणे ।।**
**फोडिले भांडार धन्याचा हा माल । मी तो हमाल भारवाही ।।**

**– डॉ. सुधीर भोंगळे**